नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/02/2024 (रविवार) सायंकाळ

---

## नागपूर ग्रामीण पोलीसांची अवैध्य गोवंश वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

दि. १०/०२/२०२४ रोजी मौजा धानोली येथे पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन हद्दीत स्टाफसह पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय माहिती मिळाली की, काही इसम हे अवैधरीत्या जनावरांची वाहतूक करीत आहे, अशा मिळालेल्या माहितीवरून नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता यौध्दा पिकअप गाडी क्र. एम. एच. –२५/ पी. ५८२५ च्या चालक/ मालक याने त्याचे ताब्यातील गाडीमध्ये बेकायदेशीरपणे गोवंशाचे पाय बांधुन निर्दयतेने, क्लेशदायकपणे कोंबुन चाऱ्यापाण्याची व्यवस्था न करता गोवंशाची कत्तलीकरीता वाहतुक करतांना तसेच लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल असा प्रकारे निश्काळजीपणाने बेदकारपणे व भरधाव वेगाने वाहन चालवितांनी पलटी होवुन डाल्यामध्ये असलेले गोंवश पुढील प्रमाणे १) एक पांढ–या रंगाचा गोरा अंदाजे वय दिड वर्ष, २) एक पांढ–या रंगाचा गोरी अंदाजे वय २ वर्ष, ३)एक काळया रंगाचा गोरा अंदाजे वय अडीच असे तिन गोंवश मरण पावले. तसेच ४) कोसा रंगाचा गोरा अंदाजे वय ३ वर्ष कि.१०,००० रू, ५)लाल रंगाचा बैल वय ५ वर्ष कि. १५,००० रू, ६) काळया कोसा रंगाचा बैल कि.२०,००० रू ७) लाल रंगाचा गोरा वय अडीच वर्ष किं. ८,००० रू ८) काळया रंगाचा बैल वय ७ वर्ष किंमती १५,००० रू ९)पांढ–या रंगाचा गोरा वय ४ वर्ष कि. ७,००० रू असे एकुण सहा गोवंश जखमी झाले व पिकअप गाडीचा चालक घटनास्थळा वरून पळुन गेला. घटनास्थळा वरून यौध्दा पिकअप गाडी क्र. एम.एच.२५ पी. ५८२५ किमती ४,०००००/– रू. व पिकअप मधिल जख्मी ६ लहान मोठे गायी, गोरे गोंवश कि.७५,००० रू असा एकुण ४,७५,००० रू चा माल जप्त करण्यात आला. जखमी ६ गोवंश जनावरे सुरक्षेते व पालन पोशण करीता ग्रामपंचायत कार्यालयीन धानोली येथील कोंडवाडयात ठेवण्यात आले. आरोपीतांविरूद्ध पोस्टे अरोली येथे कलम २७९,३३६,४२९ भादवी सहकलम ११(१),(ड) प्रा.छळ. अधि. १९६० सहकलम ५ए(२)९ महा. पशु, स.अधि. १९७६ सहकलम १८४ मो.वा.का अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

**नागपूर ग्रामीण पोलीसांची अवैध्य गोवंश वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई**

पोस्टे खापा अंतर्गत मौजा जवाहर टी पॉईट येथे दि. 09/02/2024 चे 23.32 वा. ते दि. 10/02/2024 चे 00. 02 वा. दरम्यान पोस्टे खापा येथील स्टाफ पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय माहिती मिळाली की, काही इसम हे अवैधरीत्या जनावरांची वाहतूक करीत आहे, अशा मिळालेल्या माहितीवरून नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता **आरोपी नामे— १) परमाल सुखपाल सनिया वय २४ वर्ष २) सलमान असलम कुरेशी वय ३२ वर्ष रा. दोन्ही रा. बिचवा जि. छिंदवाडा** यांनी आपले वाहन महेंद्रा बोलेरो मिनीवाहन क्र. एम.एच ४०, सी.एम. ५२०६ यातील वाहनातील डाल्यात ९ काळया रंगाचे लहान हले किंमत ५४,०००/रू गोवंश, कत्लीकरीता आखुड दोराने त्याचे पायाला बांधुन अत्यंत क्रुर व निदर्यतेने वाहनाचे डाल्यात कोबुंन चारा पाण्याची कुठलेही व्यवस्था न करता वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून महेंद्रा बोलेरो मिनीवाहन क्र. एम.एच ४०, सी.एम. ५२०६ किंमत ५,००,०००/— रू व ९ काळया रंगाचे लहान हले किंमत ५४,०००/— रू गोवंश असा एकुण ५,५४,०००/रू माल जप्त करण्यात आला आहे. आरोपीतांविरूद्ध पोस्टे खापा येथे कलम 11(1)(ड) प्रा.प्र.अधी. सहकलम 5(1)(5)(ब) 9 महा. प्र. अधी. सहकलम 109 भादंवि सहकलम 130/177 मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर